# मृद विज्ञान विभाग
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## निविदा सूचना

जा. क्र./मृवि/मापप्र/मजूर/ ११ /२०२५
दिनांक: २ एप्रिल, २०२५

प्रति,

१) ________________________

२) ________________________

३) ________________________

**विषय: प्रयोगशाळेतील कामांसाठी कुशल/अकुशल मजुर पुरविणे करिता निविदा दरपत्रक मागविणेबाबत**

वरील विषयास अनुसरून कळविण्यात येते की, मृद विज्ञान आणि कृषि रसायनशास्त्र विभागाअंतर्गत माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळेत **सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात** विविध कामांसाठी कुशल आणि अकुशल मजुर पुरविणे करिता खालील तपशीलाप्रमाणे तसेच अटी व शर्तीचे अधीन राहून सीलबंद निविदा दरपत्रक या कार्यालयात दि. ९/०४/२०२५ **रोजी** किंवा तत्पूर्वी कार्यालयीन वेळेत सादर करावे.

| अ. क्र. | मजूर प्रकार | कामाचे स्वरूप | संख्या | कामाचे तास | दर प्रती महिना किंवा दिन प्रती मजूर (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | कुशल कामगार | विभागातील माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळेतील माती व पाणी नमुने शेतकऱ्यांकडून स्वीकारणे, काच सामान आणि प्लास्टिक सामान व सर्व उपकरणे यांची देखभाल व व्यवस्थापन करणे, विविध रासायनिक द्रव्यांची रोज नियमित हाताळणी करणे, प्रयोगशाळेत स्वच्छता ठेवणे, प्राप्त माती, पाणी इत्यादी नमुन्यांच्या नोंदी ठेवून त्यांना अहवाल वितरीत करणे, संगणकावर माहिती भरणे, वरिष्ठांनी वेळोवेळी निर्देशित केलेली कामे करणे | ०१ | कार्यालयीन वेळेत रोज किमान आठ तास | येथे नमूद करावा. |
| २ | अकुशल कामगार | विभागातील माती व पाणी परीक्षण प्रयोगशाळेतील सर्व प्रकारची कामे करणे, कुशल कंत्राटी मजुरांना साहाय्य करणे, वरिष्ठांनी वेळोवेळी निर्देशित केलेली कामे करणे. | ०२ | | येथे नमूद करावा. |

(मागील पानावर)

Scanned with CamScanner

**अटी व शर्ती**

१) सदर कामे दैनंदिन स्वरुपाची असतील व शासकीय नियमाप्रमाणे दैनंदिन आठ तासांचे काम राहील.

२) निविदे सोबत कंत्राटी मजूर पुरविण्याचा अद्ययावत परवाना, कंत्राट दाराचे आधार कार्ड, भविष्य निर्वाह निधी नोंदणी प्रमाणपत्र, व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र, ESII नोंदणी प्रमाणपत्र, जी एस टी नोंदणी प्रमाणपत्र यांच्या सत्यप्रती तसेच कोणत्याही शासकीय/ निमशासकीय कार्यालया च्या महामंडळाच्या काळ्या यादीत नाव नसल्याचे स्वयं घोषणापत्र जोडण्यात यावी.

३) निविदा सादर कर्त्याने दिलेले दर स्पष्ट, व सुवाच्च दिसतील असे तसेच अंकात व अक्षरात भरून कोणतीही खाडाखोड न करता सही व शिक्क्यासह सादर करावे. त्यामध्ये नमूद करताना किमान वेतन कायद्याचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी व किमान वेतन कायद्यानुसार सध्या मंजूर असलेले मूळ मजुरी, DA, EPF, ESIS, सेवा कर व इतर देय सर्व प्रकारच्या निधी/ भत्त्यांचा समावेश धरून दर नमूद करावेत.

४) निविदा सोमवार दि. **११/०४/२०२५** रोजी सकाळी १०.०० वा निविदा समितीसमोर उघडण्यात येतील.

५) निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार कार्यालयाचा राहील.

६) कुशल कामगारासाठी कामगार महाराष्ट्रातील कोणत्याही कृषि विद्यापीठाचा किमान कृषि पदविका धारक असावा. प्रयोगशाळेतील कामाचा अनुभव असलेल्या, कृषि पदवीधर किंवा समकक्ष व्यक्तीला प्राधान्य राहील याची नोंद घ्यावी.

७) कुशल आणि अकुशल मजूर ११ महिन्याच्या कालावधीकरिता **पूर्णतः बाह्यस्त्रोतातून कंत्राटी पद्धतीनेच** पुरवावे लागतील.

८) कामावर मजूर लावल्यानंतर **पूर्णतः बाह्यस्त्रोतातून कंत्राटी पद्धतीने मजूर लावण्याबाबतच्या** शासनाने ठरवून दिलेले मानके, अटी व शर्ती, कायदे व नियम यांचे पालन करण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची / कंत्राटदार संस्थेची राहील.

९) कोणत्याही दिवशी मनुष्यबळाचे कामावर हजर राहणे शक्य होत नसल्यास अशा परिस्थितीत पर्यायी व्यक्तीची व्यवस्था करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची / कंत्राटदार संस्थेची राहील.

१०) दैनंदिन कामाचे स्वरूप आणि कामाची निकड लक्षात घेवून मजुरांची मागणी वेळोवेळी बदलती/ कमी जास्त राहील. त्यामुळे दैनंदिन आवश्यकतेनुसार/ केलेल्या तोंडी मागणीनुसार मनुष्यबळ (संख्या) पुरविण्याची जबाबदारी कंत्राटदाराची / कंत्राटदार संस्थेची राहील.

११) पुरविलेल्या मजुराचे काम समाधानकारक नसल्यास त्याला कोणत्याही पूर्व सूचनेशिवाय कामावरून काढून टाकण्याचे संपूर्ण अधिकार निम्न स्वाक्षरीकर्त्याकडे राहतील.

१२) सदरची कामे ही पूर्णतः बाह्य स्त्रोतातून असल्याने जेष्ठता यादी किंवा कामावरील हजेरीची नोंद होणार नाही व मजुराला असा कोणताही दावा करता येणार नाही.

१३) मजूर पुरविण्याबाबत इतर अटी व शर्ती मा. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे पत्र क्र. शा. अ. /४४७/२०२२, दि. १८/१०/२०२२ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार असून ते कार्यालयीन वेळेत उपलब्ध असतील.

प्रमुख,
मृद विज्ञान विभाग,
डॉ. पंदेकृवि, अकोला

Scanned with CamScanner